# नियमीत दिवाणी मुकदमा नं. २१०/२०२४ मधील नि.२९ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १, ३ ते ५ यांनी त्यांच्या विरूध्द झालेला एकतर्फा चौकशीचा आदेश रद्द करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांचे कथन की, वादीने प्रतिवादी यांचेविरुध्द दावा दाखल केला असून सदर दाव्याचे समन्स प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांना बजावणी झालेली आहे. यातील प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांना कायदयाचे ज्ञाने नसल्यामुळे व यातील कांही प्रतिवादी हे परगावी राहणेस असल्यामुळे त्यांना वकीलांशी संपर्क करुन कैफियत म्हणणे वेळेत देता आले नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचे विरुध्द गेल्या तारखेस एकतर्फा विना कैफियत आदेश केलाआहे. सदरचा दावा हा स्थावर मिळकती संदर्भात असलयाने प्रस्तुत प्रतिवादी यांचा हक्क गुंतलेले असल्यामुळे सदरचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. सबब प्रतिवादी क्र. १, ३ ते ५ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला एकतर्फा चौकशीचा आदेश रद्द करण्याची तसेच त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यास परवानगी देणयाची विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जाखाली आपले म्हणणे दिले की, संपूर्ण नस्ती पाहता प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांना कोर्टाच्या बाबतीत कोणतेही गांभीर्य नाही. कोर्टाने पाठविलेली नोटीस वेळेत पोहोचून सुध्दा वरील प्रतिवादी हजर झाले नाहीत व वेळेत कैफियत व म्हणणे दिले नाही. सबब आदेश रदद होवू नये व वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

४. प्रतिवादी यांचा अर्ज वाचला. वादींचे म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी यांचेविरुध्द सरसनिरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी व मनाईसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांना दि.

०९.०५.२०२४ रोजी दाव्याचे समन्स बजावणी झाल्याचे दिसून येते. तसेच प्रतिवादी क्र.१ ते ५ हे दाव्याकामी दि.२५.०६.२०२४ रोजी हजर झाल्याचे दिसून येते. वास्तविक प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स मिळालेपासून तेथून पुढे त्यांनी ३० दिवसांच्या आत किंवा त्यापुढे ६० दिवसांच्या आत असे एकूण ९० दिवसांच्या आत कैफियत दाखल करणे गरजेचे होते. कायद्याप्रमाणे कैफियत दाखल करणेची मुदत ९० दिवसांनी संपते. अभिलेखावर असे दिसून येते की दिनांक १७/०५/२०२४ रोजी माझे पुर्वाधिकारी यांनी प्रतिवादी क्र.१, ३ ते ५ यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारित केलेला आहे. सदरचा दावा स्थावर मिळकतीचा असल्याने तसेच वाटपाचा देखील असल्याने सर्व आवश्यक पक्षकारांचे म्हणणे व कैफियत अभिलेख सदरी असणे अत्यंत गरजेचे आहे. सदरचा दावा गुणांगुणावर न्यायनिर्णयीत करणेसाठी देखील प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर असणे आवश्यक असल्याने प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला एकतर्फा चौकशीचा आदेश रदद करणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांनी आपल्या अर्जाचे पुष्टयर्थ नि.३० खाली शपथपत्र दाखल केले आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी विरुध्दचा एकतर्फा चौकशीचा रद्द करण्यात येतो.

KANCHAN BABASAHEB SONAWANE
Digitally signed by KANCHAN BABASAHEB SONAWANE
Date: 2024.07.23 10:54:56 +0530

(**श्रीमती के. बी. सोनवणे**)

दि. १९/०७/२०२४

२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

सांगोला.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order :-

a. Name of the Stenographer : G.L.Sutar

b. Court : 2nd Jt.C.J.J.Dand J.M.F.C., Sangola.

c. Judgment/Order signed by PO on : 19.07.2024

d. Judgment/Order uploaded on : 23.07.2024